मेस्को,स्थानिक स्वराज्य संस्था व इतर बाहय-यंत्रणा यांचेकडील पहारेकरी व सफाईगार कर्मचा-यांचे वेतन अदा करण्यासाठी वित्तीय नियम नमुद करुन मंजूरीचा शासकीय अधिकार मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
मंत्रालय विस्तार भवन,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
शासन ज्ञापन क्रमांक : मंजूरी २८११/२०१६/प्र.क्र.१०६/व्यशि-२
दिनांक ::: ११ डिसेंबर २०१७

वाचावे ::: (१) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्रमांक : १५/मेस्को प्र.मंजूरी/२०१७/२२९,दि.०९.११.२०१७.
(२) वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक :::विअप्र२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२ दि.१७.०४.२०१५.

ज्ञापन :::---

संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी संदर्भाधीन पत्र क्रमांक (१) अन्वये शासन निर्णय,उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : एसजीए-१५०६/प्र.क्र.९२/काम-५,दि.०८/११/२००६ संचालनालयांतर्गत असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था/कार्यालयामध्ये बाहय-यंत्रणाव्दारे भरलेल्या पहारेकरी व सफाईगार पदांवर ठेका पध्दतीवरील कंत्राटी पध्दतीने भरलेल्या पदांचे मासिक वेतन उपलब्ध अनुदानातून अदा करण्यसठी वित्तीय वर्ष २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात विषयाधीन खर्चास वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक (२) च्या निर्णयातील भाग पहिला,उप विभाग ४ मधील अ.क्र.११ अनुसार,प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत शासनास विनंती केली आहे.

संचालनालयाच्या विनंतीनुसार बाहय यंत्रणाकडून संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था/कार्यालयांमये कंत्राटी पध्दतीने भरण्यांत आलेल्या पहारेकरी व सफाई कामगारांच्या वेतनापोटी अदा करण्यांत येणा-या रकमेच्या देयकांस वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक (२) च्या शासन निर्णयातील भाग पहिला, उप विभाग ४ मधील अ.क्र.११ अनुसार याव्दारे मंजूरी देण्यांत येत आहे.तसेच,सदरचा खर्च "मागणी क्र.झेड-०१,२२३० कामगार व सेवायोजन (०३) प्रशिक्षण,(०२) कारागिरांचे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण (०२) (०१) कारागिरांचे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण (२२३० ए ०३१)

(योजनेतर)(दत्तमत),(१०) कंत्राटी सेवा" या उद्दिष्टांतर्गत करण्यांत आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून रु २२,२१,५८,०००/- ( रुपये बावीस कोटी एकवीस लाख अठठावन्न हजार फक्त ) खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

प्रस्तुत ज्ञापन,वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : विअप्र२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ दिनांक १७ एप्रिल २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८,भाग पहिला, उप विभाग - चार मधील अनु.क्र.११ अनुसार " बाहय यंत्रणेकडून करुन घेण्यांत येणा-या कामाचा खर्च मंजूर करणे" या बाबी संबंधी प्रशासनिक विभागास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारास अनुलक्षून निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( र.ना.गिते )
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२. प्रधान महालेखापाल ( लेखा परीक्षा- १ व २ ) महाराष्ट्र - १, मुंबई/ नागपूर
३. प्रधान महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता - १ व २ ) महाराष्ट्र - १, मुंबई / नागपूर
४. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. निवड नस्ती ( व्यशि-२) , कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,मंत्रालय,मुंबई.